**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 9.134
Volume - 9, Issue - 1, January - 2026

DOIs:10.2018/SS/202601010 --:-- Research Paper / Article / Review

# मौलिक वाङ्मयांने नटलेली वामनदादांची अजरामर गाणी!

**तुषार लिंबाजी खंडारे**
संशोधक विद्यार्थी
श्री. मुक्तानंद महाविद्यालय
गंगापूर, जि. छत्रपती
संभाजीनगर

**प्रा. डॉ. सविता डी. वावगे**
संशोधक मार्गदर्शक व प्राध्यापक
मराठी विभाग
श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर

**सारांश** : वामनदादा कर्डक प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेबांच्या सत्वशील विचारांची पालखी आपल्या समर्थ खांद्यावर वाहून नेणारा आणि आयुष्य झिजवणारा अस्सल लोककवी गायक ! दलित साहित्यिक कवींना आंबेडकरी ऊर्जा पुरवणारा समर्थ नायक !! त्यांनी आपल्या प्रखर पहाडी वाणीने आणि धारदार गाण्याने आंबेडकरी समाज पेटवला. मरगळलेल्या मनात चैतन्याची ऊर्जा भरत त्याला निद्रीस्त अवस्थेतून उठवला. त्यांच्या धारदार गळ्यातून आशयघन गाण्यांच्या सरी बरसायच्या.

## 1. प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेबांच्या शाबासकीस पात्र ठरलेल्या जनकवी वामनदादांचा जन्म १५ ऑगष्ट १९२२ ला देसवंडी, ता. सिन्नर जिल्हा नाशिक येथे झाला. ते तीन वर्षांचे असतांनाच त्यांचे पितृछात्र हरपले. आईचे नाव सईबाई वडिलांचे नाव तबाजी कर्डक. मुंबईला साबणाच्या कारखान्यात राबत असतांनाच त्यांना आंबेडकरी चळवळीचे महत्व जाणवले. याच चळवळीने शालेय शिक्षणापासून वंचित राहिलेल्या दादांना लोककवी वामनदादा कर्डक बनवले ! पुढे ते १९४३ ला गिरणी कामगार म्हणून सेवा करु लागले. बाबासाहेबांची विचारोत्तेजक सभा ऐकल्यानंतर त्यांनी समता सैनिक दलात काम करायला सुरवात केली. मुंबईतच त्यांनी गीतलेखनास प्रारंभ केला. बाबासाहेब हयात असतांनाच एक प्रभावी गायक, गीतकार आणि खर्डे प्रबोधनकार म्हणून ते नावारुपाला आले. सामान्यांना समजणाऱ्या सहज सोप्या सुबोध भाषेत त्यांनी गीत लेखन केले. भरदार आणि धारदार आवाजामुळे श्रोत्यांना मंत्रमुग्ध करायचं कसब त्यांना अवगत झालं. ते फक्त कार्यक्रम सादर करणारे व्यावहारीक गीतकार नव्हते. ते श्रोत्यांच्या मनात आंबेडकरी विचारांची ऊर्जा पेरत श्रोत्यांना अंतर्मुख करायचं सामर्थ्य त्यांच्या गीतात दडलेलं असायचं धनाने दरिद्री असलेले वामनदादा अक्षरधनाचे कुबेर होते. गीतासाठी अर्थवाही आणि प्रभावी ठरणारी शब्दरचना ते करीत. आंबेडकरी विचारांशिवाय पीडित, दु:खदग्ध समाजाचं उत्थान होऊ शकत नाही हे त्यांना पटलं होतं. म्हणून अभेद्य निष्ठेने, जिद्दीने, तळमळीने आणि खऱ्या कळकळीने आपल्या

कवनांतून आंबेडकरी विचार भरभरुन वाटत राहिले. याचवेळी त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध होतांनाही पाहिले! प्रभावी अंतःकरणाला भिडणारे शब्द, धारदार आवाज आणि वेधक प्रस्तुती या त्रिसूत्रीवर ते हजारोचा जनसमूह खिळवून ठेवत.

**2. सामाजिक आशय :**

वामनदादांच्या गीतांमध्ये सामाजिक आशय ठासून भरलेला होता. ओघवती शब्दकळा आणि सुस्पष्ट भूमिका यामुळे त्यांची सर्वच गीते वाड्मयीन कसोटीवरही खरी उतरतात...

तुफानातील दिवे

आम्ही तुफानातील दिवे वादळवारा पाऊसधारा

मुळी न आम्हा शिवे !

ही रचना अंतर्गत लय घेवूनच अवतरली आहे. स्वतःला तुफानातील दिवे म्हणणारी कल्पना स्वभान आणि अस्मिता जागवणारी आहे. या गीताचा मुखडा मनातला गौरवभाव जागवणारा आहे ! आंबेडकरी विचार उर्जेने तेजाळणारा दिवा विझू द्यायचा नाही असा मूल्यवर्धा संदेश या ओळी प्रकट करतात. वामनदादा सहजपणे या चिरेबंद व्यवस्थेवर प्रहार करतात. शोषकांच्या प्रतिनिधीला निर्भयपणे जाब विचारतात...

**3. आर्थिक विषमतेवर भाष्य**

सांगा आम्हाला बाटा-बिर्ला

टाटा कुठे आहे हो ऽ

सांगा धनाचा साठा

आमचा वाटा कुठाय आहे हो ऽऽ ?

शोषितांच्या अन्यायग्रस्त मनातला प्रखर विद्रोह आणि राग या ओळीतून व्यक्त झालायं. खास कर्डकी शैलीत हे गीत अवतरले आहे. क्रांतीपूर्ण विचारांना साकार करण्याचं कार्यही दादांच्या कवनांनी केलेलं आहे.

**4. समाजातील विसंगती आणि श्रम स्वावलंबनाचे मार्मिक :**

नीच नीतीचा कापू गळा

मंजूळा पाजळ अपुला विळा !

अशा सहज सोप्या गीतातून ते नीतीचे अन् जीवन विषयक तत्वज्ञान मांडून कृषिसंस्कृतीचं महात्म्य अधोरेखीत करतात. गादी में गादी सारख्या रचनेतून राजकीय व्यंगावर घणाघात घालतात.

मानवाच्या विद्यारी

ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 9.134

मुला तू

नको विसरुन जाऊ

तुला तू

हा व्यापक विचार समस्त मानवजातीला मानवतेचे आवाहन करणारा, रंजनासोबत अंजन घालणारा विचार आहे.

स्वातंत्र्याचा अर्थ कळू ऽऽ था

आता तरी गरिबाला घास मिळू द्या ऽऽऽ.

अशी रचना निर्माण होण्यासाठी मनात व्यवस्थेला भीमटोला लगावण्याची धमक आणि डोक्यात समतापूर्ण विचारांची चमक असावी लागते. वामनदादा स्वतःच तुफानातील दिवा होते. भीमगर्जना करीत गर्जणारे वादळ होते. व्यवस्थेच्या निष्ठूर कड्यांवर कोसळणारी लखलखणारी वीज होते.

शब्दांच्या घणाने

मस्तवाल वाकवता येतो मशाल

पेटली की अंधारही फाकवता येतो !

या विचारांवर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणून ते स्वतः जळत जळत शब्दांची मशाल घेवून व्यवस्थेतला अंधार जाळत राहिले!

वाळूनी चालला उभा जोंधळा

कोण राखील माझ्या भीमाचा मळा

या निसर्ग प्रतिमा घेवून अक्षरबध्द झालेल्या ओळी आंबेडकरी विचार विन्मुखतेच्या संदर्भात लक्ष्यवेधी ठरतात.

**5. उपकार स्मरून कृतज्ञतेची गौरवगाथा :**

उध्दरली कोटी कुळे,

भीमा तुझ्या जन्मामुळे जखडबंद

पायांतील साखळदंड तटातट तुटले तू ठोकताच दंड

झाले गुलाम मोकळे ऽऽऽ

किंवा

जीवाला जिवाचं दान

माझ्या भीमानं केलं

झिजून जिवाचं रान

माझ्या भीमानं केलं

या भीम गीतांमधून कोट्यवधींच्या मनातील आदरभाव कृतज्ञतामय शैलीत अक्षरबध्द झालाय.

**6. मानवतावादी गीतरचना :**

या ओळीतून श्री मनाचा आर्त हुंकार बाहेर पडला आहे. प्रखर विज्ञानवादी, बुध्दीप्रामाण्यवादी, अज्ञानाला छेद देणारा तरीही करुणेच्या महासागरात समस्त मानवतेला कवेत घेणारा सत्वाषय काही कवांतून व्यक्त झालार्य.

पाहिले ना जे कधी ते

आज आम्ही पाहतो

जात असता माऊलीची

लाज आम्ही पाहतो

त्रिशरणाची मंगल वाणी

घुमते मंगल धामी

आणि -

सारे मानव प्राणी ना उच्च नीच कोणी

कुणीही यावे शुय्द बनावे, बुध्दांच्या चरणी!

ही गाणी कुंठित मनाला समस्त भय भेर्दाच्या कोंडमाऱ्यातून मुक्त करणारी, मेंदूला समतेचा विशुध्द ऑक्सिजन पुरवणारी आशयघन संपदा आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी तिचे जाणीवपूर्वक संप्रेषण करायला हवे. आंबेडकरी विचारांचा ध्यास हाच वामनदादांचा खरा श्वास होता. त्यांनी निर्मिलेल्या शब्द संपदेचे जतन करणे हीच या कलदार आणि कलंदर भीम गायकाला आणि नायकाला खरी आदरांजली ठरणार आहे.

ज्या काळात दलित समाजाला आपल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक हक्कांची जाणीव झालेलो नव्हती अशा काळात वामनदादांनी हातात लेखणी घेतली. त्यांची लेखणी सर्वच विषयांना हात घालत दंभ-डोंगावर प्रहार करीत आली. त्यांनी हुंडाबंदी, दारुबंदी, व्यवनमुक्ती, देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, इत्यादी विषय हाताळत आपल्या कवनांतून श्रमिकांच्या घामाचे, कामगारांच्या कामाचे आणि विशाल मानवतेचे दर्शन घडवले.

बंधू रे शिपाया...........

तू दे रे दे रुपाया ऽऽ,

जरी संकटांची काळरात्र होती -

तरी भीमराया तुझी साथ होती

त्रिशरणाची वीणा वाजे, पंचशीलेचा टाळ, द्या फाशीची शिक्षा, जाळा जितेपणी! पण जाळण्या भीमाला, सांगू नका कुणी अशी वेगवेगळ्या धाटणीची गाणी त्यांनी लिहिली. प्रबोधनात्मक जागृतीगीत वामनदादा प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेबांचे कणखर, लडाऊ, सच्चे, टिकाऊ अनुयायी होते. आंबेडकरी समाज अभंग रहावा असे त्यांना वाटे. आंबेडकरांचं नाव घेत स्वतःचं कोट कल्याण करणाऱ्या लबाड, विकाऊ लोकांविषयी त्यांच्या मनात तीन खंत होती.

भीमा तुझ्या मतांचे

जर पाच लोक असते

तलवारीचे तयांचे न्यारेच टोक असते !

हे त्यांचे उपहासगर्भ, मर्मभेदी गीत खूपच बोलके आहे. एकीच्या संदर्भात त्यांनी अत्यंत सहज सोप्या भाषेत भाष्य केलंय. ते म्हणतात -

हा मंत्र आईचा मला मिळाला सोपा

जावे ना कुठेही त्याजून अपुला खोपा

त्या वामनाला हवा आहे एकोपा

या कुटूंबातला लहानसा तो जोपा !

वाटचाल, मोहळ, हे गीत वामनाचे, निवडक वामन कर्डक- ही त्यांची प्रकाशित पुस्तके, माझ्या जीवनाचं गाणं हे त्यांच आत्मचरित्र. दादांना जीवनात भरपूर मान सन्मान मिळाला. त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्यावर भरभरुन प्रेम केलं. त्यांना कुणी वादळ तर कुणी झंझावात म्हटलं. कुणी धगधगता निखारा तर उसळणारी लाट म्हटलंय. दादा व्यवस्थेच्या रापलेल्या पाठीवर जोरदार भीमटोला लगावणारे भीमसेनानी होते. ते झुंजार शाहीर होते. तुफानातील तेजाळणारा दिवा होते! अखेरपर्यंत प्राणपणाने धगधगणाऱ्या या स्वयंप्रकाशी दिव्यास सविनय जय-भिम!

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तेजस्वी विचाराचा संदेश सांगत गावोगाव घोंघावणारे वामनदादा कर्डक नावाचे अस्वस्थ वादळ १५ मे २००४ रोजी शांत झाले. त्यांच्या निघून जाण्याने प्रज्ञासूर्य बाबासाहेबांचे विचार वस्ती-वस्तीत, मनामनात तेजाळत ठेवणारा एक प्रखर दिवा विझला.

**7. निष्कर्ष :**

1) लैकिक अर्थाने जिला शाळा म्हणतात. त्या शाळेत न शिकताही जीवनाच्या शाळेतून अनुभवाआधारे वामनदादा कर्डक यांनी गीते लिहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तळागाळातील समाजापर्यंत पोहोचविले. आहेत हे वामनदादांनी गीतांतून दर्शविले.

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन 1960 नंतर साहित्य लेखन करणाऱ्या आंबेडकरवादी साहित्याचे परिवर्तन आणि जीवनानुभूतीतील दाहकता हे वैशिष्टये आहे.

3) शेतात कष्ट करणारे आत्महत्या करीत आहेत. ऐतखाऊ घोटाळे बाज आरामात जगत जागतिकीकरणामुळे भारतात आर्थिक विषमतेची दरी वाढेल हे वामनदादाचे भाकीत अगदी तंतोतंत खरे ठरत आहे.

4) सध्या नैतिकतेचे अधःपतन होत चालले आहे. महिलांकडे केवळ भोगवस्तू म्हणून पाहि जात आहे. गुन्हेगारांना कायद्याची भीती राहिली नाही. त्यामुळे आया बहिणींची अ सुरक्षीत राहिली नाही. गुन्हेगारांना कठोर शासन व्हावे असे वामनदादा म्हणतात.

**संदर्भग्रंथसूची :**

1. कर्डक वामन 1979, मोहोळ, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.
2. पानतावणे 2010, गंगाधर आंबेडकरी जाणीवांची आत्मप्रत्ययी कविता : गोदा प्रकाशन, औरंगाबाद
3. बोराडे बाबा 2011, आंबेडकरी लोकशाहीर वामनदादा कर्डक : आनंद प्रकाशन, औरंगाबाद.
4. अंभोरे उत्तम 2003, अस्मितेच्या नव्यावाटा ; कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.
5. धोंडगे पंढरीनाथ 2014, अक्षरलेणी ; अथर्व पब्लिकेशन, धुळे. (संपादक)
6. जाधव मा.मा. 2016, अक्षरगाथा ; बळीवंश प्रकाशन, नांदेड. (संपादक)